**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १३/२०२६मधील निशाणी १ वरील आदेश**

**CNR NO.MHSN070001612026**

**आशितोष उर्फ अक्षय दबडे वि महाराष्ट्र सरकार**

सदरचा अर्ज अर्जदार आशितोष उर्फ अक्षय बाळासाहेब दबडे यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता ५०३ अन्वये कवठे महांकाळ पोलीस ठाणे यांनी सी आर क्रमांक ०८/२०२६ मध्ये जप्त केलेली मारुती सुझुकी कंपनीची एक्स एल ६ हे चारचाकी वाहन ज्याचा नोंदणी क्रमांक MH-43-BY-6599 ही सुपुर्तनाम्यावर परत मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. सदर अर्जाचे पृष्ठ्यर्थ अर्जदार यांनी शपथपत्र दाखल केले आहे.

२. अर्जदारच्या म्हणण्यानुसार सदरचे वाहन कवठे महांकाळ पोलीस ठाणे यांनी सी आर क्रमांक ०८/२०२६ मध्ये जप्त केले आहे. या गुन्हयाशी अर्जदार यांचा कोणताही संबंध नाही. सदरचे वाहनाचा अर्जदार हे नोकरीच्या ठिकाणी तसेच नोकरीच्या कामानिमित्त इतर ठिकाणी रोजचे येणे जाणे करणे हे गरजेचे असते. तसेच अर्जदार यांचे घरी तयांचे वडीलांना दवाखान्यामध्ये उपचार घेणेसाठी वारंवार जावे लागते. तसेच सदरचे वाहन पोलीस ठाण्यात पडुन राहिल्यास ते खराब होवून सदर वाहनाचे स्पेअरपार्ट निकामी होणार आहेत.अर्जदार यांना या नोकरी व्यतिरीक्त अन्य कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. सदरचे वाहन न मिळाल्यास अर्जदार यांचे पैशात न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे अर्ज वाहन परत मिळण्यास दाखल केलेला आहे. अर्जदार न्यायालय सांगेल त्या अटींची पुर्तता करण्यास तयार आहेत. म्हणुन सदर वाहनाचा ताबा सुपुर्तनाम्यावर त्यास मिळावा अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर कवठे महांकाळ पोलीस ठाणे यांचे म्हणणे मागविण्यात आले होते. त्याप्रमाणे त्यांनी आपले म्हणणे सादर करुन जप्त वाहन परत करण्यास तिव्र आक्षेप नोंदविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार सदरचा गुन्हा हा गंभीर व मानवी शरिराविरोधात आहे. वर नमुद वाहनातून जावून आरोपींनी फिर्यादीस बाहेर बोलावून कोयत्याने मारुन गंभीर दुखापत केली आहे. सदर वाहन मुळ मालकास परत दिल्यास तो अशाच प्रकारचे गुन्हे करण्याकरीता सदरचे वाहन वापरण्याची शक्यता आहे. सदरचे वाहन मुळ मालकास परत दिल्यात तो सदरचे वाहन विक्री करेल अथवा न्यायालयीन कामकाजाकरीता हजर ठेवणार नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

४. सदर अर्जावर सरकारी अभियोक्ता, यांनी देखील त्यांचे म्हणणे सादर केले असून प्रस्तूत जप्त मुद्देमाल ही गंभीर गुन्हयात वापर केले आहे. जप्त मुद्देमाल अर्जदार यास परत दिलेस विक्री करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. अर्जदार यांनी प्रस्तूत अर्जाच्या पुष्ठ्यर्थ गु. र. नं. ८/२०२६ ची प्रत, जप्त वाहनाचे पडताळणी केलेले आर.सी बुक झेरॉक्स प्रत तसेच अर्जदार यांचे आधार ओळखपत्र दाखल केले आहेत. सदर प्रतिंचे अवलोकन केले असता, जप्त वाहन ज्याचा पासींग नं. एम एच ४३- बी वाय - ६५९९ असा असून चेसीस क्र. MA3CNC32SMM278173 व इंजिन नं. K15BN9215706 हे अर्जदार याच्या मालकीचे असल्याचे दिसत आहे. अर्जदारने सदर अर्जाच्या पुष्ठ्यर्थ नि.क्र. ०४ वर शपथपत्र दाखल केलेले आहे. याशिवाय, अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही जप्त मुद्देमालाची मागणी केलेली नाही. यावरून जप्त मुद्देमाल अर्जदारचे मालकीचा

असल्याचे दिसुन येते. तपासीक अमंलदार यांनी जरी तुर्त वाहन परत देण्यात हरकत घेतली असली तरी सदरचे वाहन कोणत्या कारणासाठी आवश्यक आहे याबाबत खुलासा सादर केलेला नाही. परंतू अर्जदाराने वाहनाची विमा पॉलिसी सादर केलेली नाही. सबब अर्जदारांने वाहन ताब्यात मिळाल्यापासून ०७ दिवसांच्या आत त्याचा विमा उतरवून प्रत तपासिक अंमलदार यांच्याकडे सादर करावी.

६. मा.सर्वोच्च न्यायालयाने सुंदरभाई **अंबालाल देसाई -वि- स्टेट ऑफ गुजराथ, (Special Leave Petition(Cri) 2745 of 2002)** या न्यायनिवाड्यामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५१ प्रमाणे तसेच जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाच्या अनुषंगाने निर्देश दिलेले आहेत.

७. सदर खटल्याचा निकाल लागण्यास काही कालावधी लागणार आहे. अर्जदाराच्या कथनानुसार जप्त करण्यात आलेले मुद्देमाल पो.स्टे.मध्ये आहे. जप्त मालाचे स्वरूप पाहता ते पो.स्टे. मध्ये पडून राहिल्यास खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्जदार घालून दिलेल्या अटी व शर्ती पाळण्यास तयार आहेत. सबब, सदर जप्त मुद्देमाल सरकारी वकील यांनी उपस्थित केलेल्या आक्षेपास अधीन राहून काही अटी व शर्ती लादून अर्जदारास परत करणे योग्य होईल. अर्जदार यांनी दाखल केलेला अर्ज, तपासी अधिकारी यांचे लेखी म्हणणे व त्याअनुशंगाने दाखल केलेले कागदपत्र तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाचे वर नमूद न्यायनिवाड्यातील निर्देशानुसार, अर्जदार यांचा अर्ज मंजुर करुन जप्त वाहनाचा अंतरिम ताबा खालील अटी व शर्तीप्रमाणे अर्जदारास देण्यात येतो. करीता खालीलप्रमाणे आदेश.

**<u>आदेश.</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. पोलीस निरीक्षक, कवठे महांकाळ पोलीस ठाणे यांनी सी आर क्रमांक ०८/२०२६ मध्ये जप्त केलेली मारुती सुझुकी कंपनीची एक्स एल ६ हे चारचाकी वाहन नोंदणी क्रमांक एमएच-४३-बीवाय-६५९९ चा अंतरिम ताबा अर्जदार आशितोष उर्फ अक्षय बाळासाहेब दबडे, रा. नवी मुंबई, घनसोली, जि. ठाणे, यांना रक्कम रुपये १०,००,०००/- (दहा लाख रुपये) चा सुपुर्तनामा (Indemnity Bond) लिहुन दिल्यावर व त्याची योग्य ओळख पटवुन दिल्यानंतर, खालील अटींवर देण्यात यावा-

**अ.** अर्जदारने सदर गुन्ह्याचा अंतिम निकाल होईपावेतो सदरचा मुद्देमाल कोणत्याही मार्गे हस्तांतर करु नये अगर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करु नये.

**ब.** सदरचे वाहन वापरुन कोणताही गुन्हा करु नये.

**क.** अर्जदारने न्यायालय हुकुम करेल त्यावेळी सदरचा मुद्देमाल न्यायालयात हजर करणेचा आहे.

**ड.** पोलीस निरीक्षक कवठे महांकाळ पोलीस ठाणे यांनी अर्जदारच्या खर्चावर सदर वाहनाचे छायाचित्र काढुन त्याचा पंचनामा करावा. सदर छायाचित्र, पंचनामा व सदर हा निरक्षण बंधपत्र दोषारोपपत्रासोबत दाखल करावे.

**इ.** अर्जदारांने वाहन ताब्यात मिळाल्यापासून ०७ दिवसांच्या आत त्याचा विमा उतरवून प्रत तपासिक अंमलदार यांच्याकडे सादर करावी.

MAHESH ARVINDRAO KULKARNI

Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.03.11 17:00:29 +0530

दिनांक ११.०३.२०२६ **( एम. ए. कुलकर्णी )**

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग कवठेमहांकाळ.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 11.03.2026 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 11.03.2026 |
| Order /judgment uploaded on | : | 11.03.2026 |